**<u>वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>**

(पारीत केल्याची तारीख **२१.०८.२०१७**)

**०१.** वादी क्रमांक ०१ हजर व वादींतर्फे विधीज्ञ श्री. एम्. डी. पाटील हजर. प्रतिवादी क्रमांक ०१ हजर. प्रतिवादी क्रमांक ०२ व ०८ गैरहजर. प्रतिवादी क्रमांक ०१, ०२ व ०८ तर्फे विधीज्ञ गैरहजर.

**०२.** प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ ला दावा समन्स **<u>नि.क्र.०६</u>** ची दिनांक **२७.०७.२०१७** रोजी बेलिफ अहवालानुसार बजावणी झाली आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ दिनांक **०९.०८.२०१७** रोजी विधीज्ञांमार्फत हजर झाले आहेत. आज प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी मुदत अर्ज दाखल केला नाही किंवा कैफियत दाखल केली नाही.

**०३.** प्रतिवादी क्रमांक ०८ दिनांक **०९.०८.२०१७** रोजी विधीज्ञांमार्फत स्वत:हून हजर झाला आहे. आज प्रतिवादी क्रमांक ०८ ने मुदत अर्ज दाखल केला नाही किंवा कैफियत दाखल केली नाही.

**०४.** प्रतिवादी क्रमांक ०१, ०२ व ०८ यांनी **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१</u>** नुसार मुदतीत कैफियत दाखल केली नाही. म्हणून प्रतिवादी क्रमांक ०१, ०२ व ०८ विरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा **''विना कैफियत''** चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०१, ०२ व ०८ यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही म्हणून त्यांच्याविरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा **''विना कैफियत''** चालवण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**स्थळ : रोहा** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**दिनांक : २१.०८.२०१७** **जिल्हा रायगड**